RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

**वर्ष ११, अंक १४३(२)]** **शुक्रवार, नोव्हेंबर १४, २०२५/कार्तिक २३, शके १९४७** **[पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००**

**असाधारण क्रमांक ५०१**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

एफएसटी-०३/२५/प्र.क्र.४८/फ-४.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून आणि या संदर्भात सध्या अस्तित्वात असलेले सर्व नियम, अधिसूचना, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील क्षेत्र भूमापक, गट-ब (अराजपत्रित) व सर्वेक्षक, गट-क या पदाच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढील नवीन नियम करीत आहेत :-

१. या नियमांना क्षेत्र भूमापक गट-ब (अराजपत्रित) व सर्वेक्षक गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०२५ असे संबोधण्यात यावे.

२. **या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर**

(क) "**नियुक्ती प्राधिकारी**" याचा अर्थ, क्षेत्र भूमापक, गट-ब (अराजपत्रित) या पदावर उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) आणि सर्वेक्षक, गट-क या पदावर उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.)/वनसंरक्षक (प्रा.) हा प्राधिकारी आहे;

(ख) "**वृत्त**" याचा अर्थ आस्थापनाविषयक बाबींसाठी जबाबदार असलेले मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) किंवा वनसंरक्षक (प्रादेशिक) यांच्या नियंत्रणाखाली आस्थापनाविषयक प्रशासनास जबाबदार प्रशासकीय आस्थापना घटक;

(ग) "**पदोन्नतीसाठी पात्रता**" याचा अर्थ, सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियम, शासन निर्णय किंवा आदेशाद्वारे पदोन्नतीसाठी विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार पात्रता असा आहे;

(घ) "**शासन**" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे;

(ड) "**उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा**" याचा अर्थ महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा अधि. महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे व त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो;

(च) "**निवड समिती**" याचा अर्थ क्षेत्र भूमापक, गट-ब (अराजपत्रित) व सर्वेक्षक, गट-क या पदांवरील सरळसेवा भरतीसाठी उमेदवारांच्या निवडीच्या प्रयोजनार्थ शासनाकडून वेळोवेळी गठित करण्यात आलेली समिती असा आहे;

३. क्षेत्र भूमापक, गट-ब (अराजपत्रित) या पदावरील नियुक्ती ही सर्वेक्षक (गट-क) हे पद धारण करणाऱ्या आणि सदर पदावर किमान तीन वर्षाहून कमी नसेल इतकी नियमित व सलग सेवा झालेल्या व्यक्तींमधून जेष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी पात्रता धारणा करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल.

४. सर्वेक्षक (गट-क) या पदावरील नियुक्ती ही निवड समितीमार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील निकषांची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांची नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

(१) **वयोमर्यादा.—**

(अ) किमान वयोमर्यादा— सदर पदभरतीच्या जाहिरातीत नमूद केल्यानुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास १८ वर्षे पूर्ण पेक्षा कमी नसावे.

(ब) कमाल वयोमर्यादा— सदर पदभरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अमागास प्रवर्गातील व्यक्तीचे वय ३८ वर्षे पूर्ण पेक्षा अधिक नसावे आणि मागास प्रवर्गातील व्यक्तीचे वय ४३ वर्षे पूर्ण पेक्षा अधिक नसावे.

(२) **किमान शैक्षणिक अर्हता.—**

(१) उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१२ वी) उत्तीर्ण असावा.

(२) शासन मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सर्वेक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

५. (१) नियम ३ येथील पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारांची ज्येष्ठता यादी राज्यस्तरावर ठेवण्यात येईल.

(२) नियम ४ येथील पदावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची ज्येष्ठता वनवृत्त स्तरावर ठेवण्यात येईल. तथापि, नियम ४ येथील पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवाराचे पुढील पदोन्नतीचे पद राज्यस्तरीय आहे. त्यामुळे नियम ४ येथील पदावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची ज्येष्ठता यादी राज्यस्तरावर एकत्रित ठेवण्यात येईल.

६. (१) नियम ३ येथील पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने पदोन्नतीपूर्वी, शासनाने वेळोवेळी विहित केलेले नियम किंवा निर्गमित केलेल्या आदेशानुसार हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसल्यास अथवा या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळवलेली नसल्यास, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(२) नियम ४ येथील पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियम किंवा निर्गमित केलेल्या आदेशानुसार हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसल्यास अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळवलेली नसल्यास, नियुक्तीनंतर संबंधित नियमांत नमूद केलेल्या विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. हिंदी भाषा व मराठी भाषा उत्तीर्ण होत नाहीत, तोपर्यंत त्याला वार्षिक वेतनवाढ तसेच पुढील पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

७. (१) नियम ३ येथील पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, पदोन्नतीपूर्वी शासनाने वेळोवेळी विहित केलेले नियम किंवा निर्गमित केलेल्या आदेशानुसार संगणक प्रमाणपत्र अर्हता धारण केलेली नसल्यास अथवा संगणक प्रमाणपत्र अर्हता धारण करण्यापासून सूट मिळवलेली नसल्यास, नियमानुसार संगणक प्रमाणपत्र अर्हता धारण केलेले असणे आवश्यक आहे.

(२) नियम ४ येथील पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियम किंवा निर्गमित केलेल्या आदेशानुसार संगणक प्रमाणपत्र अर्हता धारण केलेली नसल्यास अथवा संगणक प्रमाणपत्र अर्हता धारण करण्यापासून सूट मिळवलेली नसल्यास, नियुक्तीनंतर संबंधित नियमांत नमूद केलेल्या विहित मुदतीत संगणक प्रमाणपत्र अर्हता धारण करणे आवश्यक राहील. संगणक प्रमाणपत्र अर्हता धारण करीत नाही, तोपर्यंत त्याला वार्षिक वेतनवाढ तसेच पुढील पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

८. (१) नियम ४ येथील नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील तरतुदीनुसार व त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नियमांनुसार, नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करताना त्यामध्ये दोनपेक्षा अधिक अपत्ये नियुक्तीच्या वेळेस हयात असल्यास संबंधित उमेदवार शासकीय नियुक्तीसाठी अपात्र राहील.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर त्याला दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाले, तर ती व्यक्ती शासन सेवेकरिता अनर्ह राहील.

९. (१) नियम ३ येथील पदावर नियुक्त होणारी व्यक्ती महाराष्ट्रात कुठेही बदलीस पात्र राहील.

(२) नियम ४ येथील पदावर नियुक्त होणारी व्यक्ती वनवृत्तात कुठेही बदलीस पात्र राहील.

१०. शासनाने वेळोवेळी कोणत्याही नियमाद्वारे किंवा आदेशाद्वारे, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीपूर्वी अथवा नियुक्तीनंतर विहित केलेल्या अटी व शर्ती संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मिलिंद म्हैसकर,**
शासनाचे अपर मुख्य सचिव (वने).

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 14th November, 2025.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No.FST-03/25/C.R.48/F-4.- In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all earlier notifications, rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Range Surveyor, Group-B (*Non-Gazetted*) and Surveyor, Group-C under the Revenue and Forest Department, Government of Maharashtra, namely :–

1. These rules may be called the Range Surveyor, Group-B (*Non-Gazetted*) and Surveyor Group-C (Recruitment) Rules, 2025.

2. *In these rules, unless the context requires otherwise*, –

(*a*) "*Appointing Authority*" means the Additional Chief Principal Conservator of Forests (Administration subordinate cadre) is competent to appoint to the candidate to the post of Range Surveyor, Group- B (*Non-Gazetted*) and Chief Conservator of Forests (Territorial) or Conservator of Forests (Territorial) is competent to appoint to the candidate to the post of Surveyor, Group- C;

(*b*) *"Circle"* means the administrative unit under the control of the Chief Conservator of Forests (Territorial) or Conservator of Forests (Territorial), as the case may be, responsible for the administration of the posts within the said administrative unit;

(*c*) *"Eligibility for promotion"* means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in rules, resolutions or orders by the General Administration Department of the Government issued in this behalf from time to time;

(*d*) "*Government*" means the Government of Maharashtra;

(*e*) "*Higher Secondary School Certificate Examination*" means the Higher Secondary School Certificate Examination conducted by the Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah. XLI of 1965) and it includes any other examination declared by the Government to be equivalent thereto;

(*f*) *"Selection Committee"* means a committee constituted from time by the Government for the purpose of selection of candidates for direct recruitment to the post of the Range Surveyor, Group-B (*Non-Gazetted*) and Surveyor, Group- C;

3. Appointment to the post of Range Surveyor, Group-B ( *Non-Gazetted* ) shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority subject to fitness, from amongst the persons holding the post of Surveyor (Group-C) having not less than three years of regular and continuous service in the said post.

4. The appointment to the post of Surveyor, Group-C shall be made by nomination from amongst the candidates recommended by selection on the basis of the results of competitive examination conducted therefor, who fulfills the following criteria, namely :-

(*i*) *Age limit*.–

(*A*) Lower Age Limit – Not less than eighteen years of age as on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the post.

(*B*) Upper Age Limit – Not more that thirty-eight years of age for the persons not belonging to reserved categories and forty-three years for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the post.

(*ii*) *Minimum Educational Qualification*.–

(*i*) Passed Higher Secondary School Certificate Examination; and

(*ii*) Possess Surveyor's Training Course Certificate of a Government recognized Industrial Training Institute.

5. The seniority list of the candidates appointed to the post mentioned in rule 3 shall be maintained at State level.

The seniority list of the candidates appointed to the post mentioned in rule 4 shall be maintained at Circle level. However, the seniority list for next promotional post of person appointed to the post under rule 4 is kept at State level. Therefore, consolidated seniority list of persons appointed to the post under rule 4 shall also be maintained at the State level.

6. (*1*) A person to be appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall pass the Marathi and Hindi Language examinations as per the rules made or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the said post.

(*2*) A person to be appointed to the post mentioned in rule 4 by nomination shall pass the Marathi and Hindi Language examinations as per the rules made or orders issued in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after the appointment, unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment and promotion to the next promotional post until he passes these examination.

7. (*1*) A person to be appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by rules made or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has already Possessed or has been exempted therefrom before getting promoted to the said post.

(*2*) A person to be appointed to the post mentioned in rule 4 by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by rules made or orders issued in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already Possessing such Certificate of Computer Operations, otherwise he shall not be eligible for annual increment and promotion to the next promotional post until he possess the same.

8. (*1*) A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rule 4 shall submit a Declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time

(*2*) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family, shall be disqualified for the appointment in Government Service.

(*3*) After the appointment of a person in the Government service, if it is found that a person having more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in the Government Service.

9. (*i*) A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable to be transfer anywhere in Maharashtra.

(*ii*) A person appointed to the post mentioned in rule 4 shall be liable to be transfer anywhere in the Circle

10. The terms and conditions specified by the Government, in any rules, or resolutions issued by Government from time to time, before or subsequent to the appointment of any Government Servant shall also be applicable to the concerned Government Servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MILIND MHAISKAR,
Additional Chief Secretary (Forests) to
Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.